आदेश

सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा या संवर्गातील एमबीबीएस वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या रिक्त पदावर कंत्राटी पध्दतीने नेमणूक झाल्याने हजर करून घेणेबाबत.
डॉ.प्रविण अंकुशराव राठोड,(एमबीबीएस),

जिल्हा परिषद, अहमदनगर

आरोग्य विभाग आदेश

जा.क्र.आरोग्य/कार्या-२/आस्था-२/वै.अ.कंत्राटी नियुक्ती/3310/२०२२

दिनांकः-२९/०६/२०२२

वाचाः-

१. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम-१९६१ चे कलम-९५
२. महाराष्ट्र नागरी सेवा वेतन नियम-१९८१ चे नियम-५६ अन्वये.
३. मा.मु.का.अ,यांचेकडील आदेश जा.क्र साप्रवि१/रवका/६९६/१६,दि.१७.०६.२०१६
४. महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभागाकडील शासन निर्णय क्रमांकःमवैअ-१०५४/प्र.क्र.२४१/सेवा-३,दिनांक.०२ मार्च,२०१५
५. शासन निर्णय क्रमांकःमवैअ-१०५४/प्र.क्र.२४१/सेवा-३,दिनांक.२१ एप्रिल २०१५
६. शासन पत्र क्र.मवैअ-२०१७/प्र.क्र.१८१/१७/सेवा-३,दि.०४ मे,२०१७
७. शासन पत्र क्र.मवैअ-२०१५/प्र.क्र.४३१/(भाग-१)सेवा-३,दि.१२ मे,२०१७
८. शासन निर्णय क्र.मवैअ-१०५४/प्र.क्र.२४१/(भाग-१)सेवा-३,दि.०३ डिसेंबर,२०१९
९. शासन निर्णय क्र.मवैअ-१०५४/प्र.क्र.२४१/(भाग-२)सेवा-३,दि.१३ जुन,२०१९
१०. शासन निर्णय क्र.मवैअ-१०५४/प्र.क्र.२४१/(भाग-२)सेवा-३,दि.०४ जुलै,२०१९
११. सदस्य सचिव,तथा जिल्हा शल्य चिकित्सक अहमदनगर यांचेकडील कार्यालयीन आदेश जा.क्र./जि.रू.अ/कंत्राटी.वै.अ.गट-अ/निवड/१२३७८-८८/२०२२,दि.२८.०६.२०२२
१२. डॉ.प्रविण अंकुशराव राठोड,(एमबीबीएस)वै.अ.(कंत्राटी)यांचा हजर अहवाल दि. २९/०६/२०२२
१३. कार्यालयीन मंजुर टिप्पणी दिनांक २९/०६/२०२२

उपरोक्त संदर्भ क्रमांक-४ ते १० चे शासन निर्णय व पत्रानुसार सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा या संवर्गातील वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या कंत्राटी पध्दतीने मानधनावर नेमणूक करण्याबाबत अटी व शर्ती विहित करण्यात आलेल्या आहेत. सदर अटी व शर्तीस अधिन राहुन संदर्भ क्र.११ चे आदेशान्वये कंत्राटी वैद्यकीय अधिकारी (एमबीबीएस) यांची नियुक्ती करण्यात आली आहे. डॉ.प्रविण अंकुशराव राठोड,(एमबीबीएस) कंत्राटी वैद्यकीय अधिकारी पदावर दिनांक २९/०६/२०२२ रोजी मध्यान्हौत्तर हजर होऊन पुढील वाटचाल आदेश मिळण्यासाठी संदर्भ क्र.१२ अन्वये विनंती अर्ज सादर केलेला आहे.

त्यानुसार डॉ.प्रविण अंकुशराव राठोड,(एमबीबीएस) कंत्राटी वैद्यकीय अधिकारी यांची संदर्भ क्र. ४ ते १० मधील शासन निर्णय व परिपत्रकात विहित केलेले अटी व शर्ती नुसार व संदर्भ क्र.११ चे आदेशातील अटी व शर्तीस अधिन राहुन प्रा.आ.केंद्र,निघोज ,ता.पारनेर ,जिल्हा अहमदनगर येथील द्वितीय वैदयकीय अधिकारी या रिक्त पदावर निव्वळ तात्पुरते स्वरूपात ११ महिने कंत्राटी कालावधीसाठी दरमहा रू.७५०००/-एकत्रित मानधनावर कंत्राटी वैद्यकीय अधिकारी या पदावर नियुक्ती देण्यात येवून हजर होण्यास दिनांक २९/०६/२०२२ मध्यान्हंपुर्व पासुन परवानगी देण्यात येत आहे. डॉ.प्रविण अंकुशराव राठोड,(एमबीबीएस) यांची प्रत्यक्ष उपस्थिती प्रा.आ.केंद्रावर हजर झालेल्या दिनांकापासून धरणेत येईल. त्यांचेवर नियुक्ती आदेशातील अटी व शर्ती बंधनकारक असुन रू.१०० चे स्टॅम्पवर अटी व शर्ती मान्य असल्याचे लेखी प्रतिज्ञापत्र सादर करावे लागेल. डॉ.प्रविण अंकुशराव राठोड,(एमबीबीएस) यांचे मानधन नियुक्तीचे ठिकाणी प्रत्यक्षात रूजु झाल्याचे दिनांकापासून व बायोमॅट्रिक्स हजेरी नुसार काढण्यात येईल, त्यांना मुख्यालयास राहणे व बायोमॅट्रिक हजेरी नोंदविणे अनिवार्य राहील.

डॉ.प्रविण अंकुशराव राठोड,(एमबीबीएस) हे कंत्राटी वैद्यकीय अधिकारी पदावर हजर झाल्यामुळे त्यांचेकडे प्रा.आ.केंद्र निघोज , ता.पारनेर , जिल्हा -अहमदनगर येथील द्वितीय वैद्यकीय अधिकारी या पदाचा नियमित कार्यभार सोपविण्यात येत आहे.

(मागे)

त्यांनी नियमित द्वितीय वैदयकीय अधिकारी पदाचा कार्यभार ताब्यात घेवून नियमित वैद्यकीय अधिकारी हजर होईपर्यंत अथवा पुढील आदेशापर्यंत कामकाज पहावे. डॉ.प्रविण अंकुशराव राठोड,(एमबीबीएस) अर्हताधारक कंत्राटी वैद्यकीय अधिकारी असून त्यांची कंत्राटी सेवा नियमित वैद्यकीय अधिकारी/बॉन्डेड (बंधपत्रित) वैद्यकीय अधिकारी हजर झाल्यास आपेआप संपुष्टात येईल याची नोंद घ्यावी.

तसेच डॉ.प्रविण अंकुशराव राठोड,(एमबीबीएस) यांनी कंत्राटी नियुक्तीच्या ठिकाणी तात्काळ हजर होऊन तेथील कार्यभार ताब्यात घ्यावा. यामध्ये हयगय अगर टाळाटाळ केल्याचे निदर्शनास आल्यास तुमच्या विरूध्द महाराष्ट्र नागरी सेवा शिस्त व अपिल नियम-१९७९ मधील तरतुदीनुसार शिस्तभंगाची कारवाई प्रस्तावीत करण्यात येईल याची नोंद घ्यावी. तसेच हजर अहवाल तालुका आरोग्य अधिकारी,पंचायत समिती पारनेर , ता.पारनेर , जिल्हा अहमदनगर यांचे मार्फत या कार्यालयास सादर करावा. सदरचा आदेश अहमदनगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आला असुन त्याचा संगणक संकेतांक क्रमांक 202206291001194 असा आहे.

(डॉ.संदिप सांगळे)
जिल्हा आरोग्य अधिकारी,
जिल्हा परिषद अहमदनगर.

प्रति,

१. डॉ.प्रविण अंकुशराव राठोड,(एमबीबीएस)कंत्राटी वै.अ.प्रा.आ.केंद्र,निघोज, ता.पारनेर, जिल्हा अहमदनगर.
२. व्दारा व प्रतः- तालुका आरोग्य अधिकारी, पंचायत समिती पारनेर ,ता.पारनेर ,जिल्हा अहमदनगर

प्रतः- माहितीसाठी सादर.

१. मा.अवर सचिव,महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग,१० मजला,गो.ते.रुग्णालय संकुल ईमारत मंत्रालय, मुंबई-०१.
२. मा.आयुक्त,आरोग्य सेवा व कु.क.तथा संचालक, रा.आ.अ.आरोग्य सेवा संचालनालय,आरोग्य भवन, सेंन्ट जॉर्जेस रूग्णालय आवार,पी डीमेलो रोड,महाराष्ट्र राज्य,मुंबई-०१.
३. मा.संचालक.आरोग्य सेवा संचालनालय,आरोग्य भवन,सेंन्ट जॉर्जेस रूग्णालय आवार,पी डीमेलो रोड,महाराष्ट्र राज्य,मुंबई-०१.
४. मा.सहसंचालक,आरोग्य सेवा(अर्थ व प्रशासन)संचालनालय,आरोग्य भवन,सेंन्ट जॉर्जेस रूग्णालय आवार,पी डीमेलो रोड,महाराष्ट्र राज्य,मुंबई-०१.
५. मा.उपसंचालक,आरोग्य सेवा,नाशिक मंडळ ,संदर्भ सेवा रूग्णालय आवार, शालीमार चौक नाशिक.
६. मा.अध्यक्ष जिल्हा निवड समिती तथा जिल्हाधिकारी,अहमदनगर
७. मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद अहमदनगर तथा सदस्य जिल्हा निवड समिती,अहमदनगर
८. मा.सदस्य सचिव तथा जिल्हा शल्यचिकित्सक,जिल्हा रूग्णालय अहमदनगर

प्रतः- कार्यवाहीस्तव.

१. जिल्हा कोषागार अधिकारी,जिल्हा कोषागार कार्यालय,अहमदनगर.
२. मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर.
३. गट विकास अधिकारी (उ.श्रे) पंचायत समिती ,पारनेर , ता.पारनेर ,जिल्हा अहमदनगर
४. वैद्यकीय अधिकारी प्राथमिक आरोग्य केंद्र निघोज , ता.पारनेर ,जिल्हा अहमदनगर
५. वेतन देयक शाखा-२ आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, अहमदनगर.
   २/- डॉ.प्रविण अंकुशराव राठोड,(एमबीबीएस) हया पदस्थापनेच्या ठिकाणी प्रत्यक्षात हजर दिनांकापासुन कंत्राटी वैद्यकीय अधिकारी लेखाशिर्षामधून त्यांचे मानधन काढण्यात यावे.
६. निवड नस्ती आस्थापना-२ शाखा.